
June 2021 – 85th Issue of
Business Ethics Foundation
Management Digest
Ethically - vibrant, interesting and entertaining !

# Contents :


1. Face sheet by vishwas datye
2. Published by
3. Editorial – Vishwas Datye
4. BEF News
5. नीतीमूल्यांचा अभाव - प्रभाव SG Bapat
6. Ethics – Sudhir Rashingkar
7. तेथे कर माझे जुळती
8. Help dynamics – N. Kulkarni
9. Pune special
10. Oyster of memory - Arvind Joshi
11. Point to ponder
12. Ethical experiences – A. Bhide
13. Paintings – N. Sareen, SG Gokhale
14. Poem –
15. Creativity – Pranav Patil
16. Humour
17. Positive News
18. Laughter corner


*******

## Published by :



BUSINESS ETHICS FOUNDATION
(Section 25 Company CIN– U93000PN2012NPL142019 2011 – 2012)

C/o. Dr. S. G. Bapat, 'Vijigeesha', 17 Prashant Nagar, Navi Peth, Pune– 411030 , Ph : +91 9881468504 Office secretary – Madhuri Chiddarwar,
punebef@gmail.com
+91 97644 61567, 020-24533931

*****



# Editorial :



Vishwas Datye
vishwasdatye@gmail.com
+91 9850035362

Dear all,
Some observations from the past several issues -

I understand that currently, BEF has a total of 267 members. Out of these 25 are institutional and remaining 242 are individual members.
If one looks at the last 12 months BEFMD issues, of these 242 individual members, only 30 are either contributing to or commenting on BEFMD issues.
Of these 30 contributors, only 10 odd are regular contributors.
Is this a normal phenomenon in most organisations?
How can we make the large group of somewhat dormant BEF members, a little more participative and vibrant?
After all, BEFMD is - of the, for the and by the BEF members.

With best wishes. ☺

# BEF news / Announcements




We had this excellent session. It was appreciated very much by those who attended. Thank you Mr Anand Kulkarni.

******

## Shraddhanjali !

Dr. Sapate and Dr. Ganesh Hegde passed away recently.

भावपुर्ण श्रद्धांजली Om shanti !

*****



# नीतीमूल्यांचा अभाव - नीतीमूल्यांचा प्रभाव



- Dr. S. G. Bapat
Founder President BEF
sgbandasso@gmail.com
+91 98814 68504

अभाव :

आपण एन्रॉन विषयी ऐकले असेलच. एन्रॉनचे दुर्दैवी नाट्य जेंव्हा घडले तेंव्हा योगायोगाने मी अमेरिकेत सांरगकडे 'शार्लेट'ला होतो. रोज 'शार्लेट ऑब्झर्वर' वाचत असे. ही बातमी वाचून विश्वासच बसेना. "एन्रॉनचे अध्यक्ष मॅनेजर्सशी मीटींग बोलावतात व सांगतात. आम्ही प्रत्येक मॅनेजरला मिलीयन डॉलर्सचे बिन-व्याजी कर्ज देणार आहोत. एन्रॉनच्या मॅनेजर्सचे पगार उत्तम होतेच. त्यांना कळेना की, हे कर्ज कशासाठी?" अध्यक्षांनीच सांगितले की, "This is not to solve your problem. It is to solve my problem of big inflow of money." एकाने सहज विचारले, "सर, या कर्जाचे आम्ही काय करणार?" उत्तर आले, "You can play on stock Exchange!"... "पण सर, यात आम्हाला तोटाही होऊ शकतो.." "आता मी तुम्हाला हे सांगायला पाहिजे कां? - तुम्ही कर्ज परत करायचेच नाहीये!" हे सर्व वाचल्यावर माझे डोके बधीर झाले आणि तिसऱ्याच दिवशी एन्रॉनच्या प्रचंड

घोटाळ्यांची.. अध्यक्षांना तुरुंगवासाचीही शिक्षा होऊ शकते, अशा बातम्या वाचायला मिळाल्या. भ्रमनिरास झाला. यालाच म्हणतात, "नीतीमूल्यांचा अभाव."

प्रभाव :

या उलट बेळगाव मधील "बिझिनेस आश्रम"चा अनुभव सांगण्यासारखा आहे. २०-२५ वर्षापूर्वीची गोष्ट आहे. आधुनिकीकरण सुरू झाले होते. "संगणक" साधारणतः रू. ७५,०००/- ला मिळत असे. कंपनीला वीस संगणक विकत घ्यावयाचे होते. बाजारात असेंबल्ड कॉम्प्युटर्स निम्म्या किंमतीत मिळत होते. मॅनेजर्सची सभा झाली. सर्वांनी ठरविले की, आपण योग्य किमंतीचे ब्रॅन्डेड कॉम्प्युटर्स घ्यावयाचे. आपण १० संगणक घेऊ व काही इंजिनियर्स रात्रपाळी करतील व दहा संगणक - २० संगणकांचे काम करू शकेल! मी स्वतः कै. सुरेश हुंद्रे यांना भेटलो. तेव्हा त्यांनी मला ही कथा सांगितली. ही सत्यकथा काय सांगते, "नीतीमूल्यांचा प्रभाव." आज बिझिनेस आश्रम हायड्रॉलिक्स उत्तम व्यवसाय करत आहे.

********

# नीतिमूल्ये(Ethics )



डॉ सुधीर राशिंगकर
sudhirrashingkar@gmail.com
+91 98220 22014

**Business Ethics of Warren Buffet [ part 3 of 3]**

In other case, of Solomon Brothers, CEO was involved in some frauds, there was big publicity ,case was filed in court, and Warren told court that he admits the mistake of CEO and asks him to quit. Court then asked to take charge of management which he did for few months, much to his own inconvenience, saw to it that things are normal and company out of danger and then within few months he appointed another CEO and left his position. Here also he went by business ethics to adhere to certain ethical standards by admitting wrong things instead of busying them .

In case of Washington post newspaper, he wanted to acquire stakes in it but the lady owner Cathleen Graham , was sensitive on the issue .He promised her that he will not take more than 10% of stakes and that he will not disturb management. On the other hand , he helped her to overcome many problems in company management.

No wonder he controls thru Berkshire Hathaway, more than 40 companies, some of which like American Express, Coca cola, Gillette etc are international brands.

As ethics , he says that he would invest in companies where investment is safe and product line is known well to him and he has good business knowledge, so investors in his company are assured safety of their money He was reluctant to invest in IT companies saying that he does not use commuter ,does not know anything about them and does not wish to bring trouble to his investors. Off late he invested in small way in Microsoft because of hs close association with Bill gates. Now Bill is on his board and warren an investor in Bill's company.

He felt that he should return the money he has earned from society as ethical and moral obligation. After his talk with Bill Gates , he decided to donate 90% of his wealth in Bill and Melinda Gates foundation, with condition that he will not pay all money at one time but @ 5% each year after ensuring that money is wisely spent. Not only that, he went round the world (including India) with Bill and urged industrialists /businessmen of repute to follow such practice.

As a result, he could motivate many to donate money for social cause in a big way.

By these various examples he has shown that business ethics can well be observed /practiced by self example and action.

******

"अनृतेन भवेत् सत्यं,

सत्येन एव अनृतं भवेत्।

यद् भूतहितम् अत्यन्तं

तत् सत्यं इति धारणा॥

महाभा.3-213--3

कधी खोटे बोलण्याने सत्याचरण केले असे होईल आणि खरे बोलण्याने खोटे केले असे होईल.

ज्यामुळे प्राणीमात्रांचे अत्यंत हित होते ते सत्य, हा निश्चित नियम आहे

Compiled by - Shrirang Gokhale

*******

# तेथे कर माझे जुळती

**आपलं घर ,मु .पो. डोणजे ,पुणे !** - डॉ. श्रीकृष्ण जोशी

काहीतरी वेगळं वाटतंय ना वाचायला ?
वेगळं तर आहेच , पण तितकंच ते विलक्षण आहे .
कारण मी दोन दिवस 'आपलं घर' मध्ये राहून आलोय आणि जे काही अनुभवलंय त्यावरून म्हणतो की ते वेगळं आणि विलक्षण आहे .
समाजानं नाकारलेली वा टाकून दिलेली किंवा परिस्थितीमुळं अनाथ झालेली निराधार लहानगी मुलं ... आणि वर्तमानातील कुटुंबव्यवस्थेत ओझं झालेले आणि नातंच नाकारल्यानं मानसिक दृष्ट्या गलितगात्र झालेले अनेक आजी आजोबा...
दोन दिवस आम्ही त्या मुलांसोबत , आजी आजोबांसोबत होतो .
पण त्यांच्याबरोबर राहताना , बोलताना , वावरताना एक वेगळा पॉझिटिव्ह दृष्टिकोन , वेगळी जिद्द जाणवत होती .
आजच्या भाषेत सांगायचं तर आम्ही क्षणाक्षणाला रिचार्ज होत होतो.
तुम्हाला सांगतो आम्ही तेथे गेल्यावर एक इवलीशी बाहुली वाटावी अशी चुणचुणीत मुलगी प्यायला पाणी घेऊन आली, आणि तिच्या पाठोपाठ चहा आणू का म्हणून विचारणारा तिच्यासारख्या लहानगा दादा आला.
कुणीही आमच्याजवळ कारणाशिवाय थांबत नव्हतं .

त्यांचे अनेक उद्योग चालू होते. मुलं सर्व प्रकारचे खेळ खेळत होती.

यातल्या एका चिमुरड्या मुलीनं सध्याच्या लोकप्रिय अशा माझा होशील ना या मालिकेत काम केलं आहे .तिला याबद्दल विचारलं तर झक्कपैकी लाजून, जीभ बाहेर काढून पळाली सुद्धा. या सगळ्यात आजी आजोबासुद्धा आमच्याबरोबर गप्पा मारत होते, आस्थेनं चौकशी करत होते.

गेल्यागेल्या भेट झाली होती ती ऋषितुल्य विजयदादा फळणीकर यांच्याशी. नंतर दोन दिवसात ते जे सांगत होते, दाखवत होते त्यानं तर भारावून जायला झालं होतं.

वस्तुतः त्यांचा स्वतःचा लहानगा मुलगा वैभव हा ऍक्युट ल्युकेमिया या दुर्धर आजारानं, अगदी लहान वयात हे जग सोडून गेला. हा एक मोठा प्रचंड आघात होता त्यांच्यावर . आणि त्यातून स्वतःला, पत्नीला सावरण्यासाठी त्यांनी स्व. वैभव फळणीकर मेमोरियल फाउंडेशन स्थापन केलं आणि त्यातून समाजातील निराधार मुलामुलींसाठी काम सुरू केलं .

ज्येष्ठ नागरिकांसाठी , वृद्धनिवास स्थापन केला .

आपलं घर मध्ये सोलर वीजनिर्मिती प्रकल्प , वापरलेल्या पाण्याचा शुद्धीकरण प्रकल्प , बायोवेस्ट कंपोस्ट खत प्रकल्प , औद्योगिक प्रशिक्षण केंद्र , बेकरी युनिट , अद्ययावत सुसज्ज ग्रामीण रुग्णालय, ब्रेस्ट कॅन्सर ऑपरेशन थिएटर व रिसर्च सेंटर. निराधार मुलामुलींसाठी अद्ययावत वसतिगृह, नेत्र तपासणी आणि उपचार कक्ष ,

दंत चिकित्सा आणि उपचार, अत्याधुनिक असा फिजिओथेरपी विभाग, ग्रामीण भागासाठी मोफत फिरता दवाखाना, निःशुल्क औषध पुरवठा, आपलं घर मधील मुलांसाठी शिक्षण आणि संस्कार केंद्र, भाजीपाला शेती, संगणकीय तांत्रिक शिक्षणासाठी सुसज्ज व्यवस्था, एक सुसज्ज ओपन थिएटर, स्टाफसाठी सर्व सुविधांनी युक्त निवासव्यवस्था...एक ना दोन, किती सांगावं.

ते, दूरदर्शन मधून मोठ्या पदावरून निवृत्त झाले आहेत, स्वतः रंगकर्मी आहेत, असंख्य पुरस्कारांनी आणि व्यक्तींनी ज्यांना गौरवलं आहे आणि त्याचा कसलाही गर्व त्यांच्या वागण्याबोलण्यात जाणवत नाही.

तुम्ही तिथल्या लहानग्यांना भेटायला हवं. त्यांच्या हातातील कला , त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील आत्मविश्वास , प्रामाणिकपणा अनुभवायला हवा.

अतिथींसाठी सुसज्ज अशा पाच खोल्या आहेत. विपुल पाणी आहे.

या साठी निष्ठावान , प्रामाणिक सहकाऱ्यांची टीम आहे . आणि अर्थातच त्यांच्या पाठीमागे विजयदादा फळणीकर खंबीरपणे उभे आहेत. एक आधारवड म्हणून !

आपलं दुःख झाकून ठेवून इतरांचं दुःख हलकं करणारा आणि त्या सर्वांच्या आयुष्यात विधायक विचार पेरणारा आधारवड. मोबाईल नंबर 9850227077

[ original article editated by vishwas datye ]

# The Help Dynamics



Nitin Kulkarni
nitienk@gmail.com
+91 9820629811

Help may be the need of the hour - but help has a natural hierarchy to follow - which stops at the first available help - that should be always kept in mind - firstly "Self-Help" - then "Family-Help" - then "Neighborhood-Help" - then "Friends-Help" - then "Relatives-Help and then "Any-Help" that is available!

"Help" has a "Local" and "Global" perspective too - it is always advisable to exhaust all "Local" resources before "Global" ones are approached and explored!

"Help" also has urgency, currency and frequency perspectives which must be kept in mind both while seeking or providing it - A vector push required to stand-up and get on with life asap on its own should be the prime motive - either way!

"Help" also has an appropriation factor associated with seekers and providers - take it - All cannot be helped by you and similarly

everyone need not rush to help one - this can be attained effortlessly, efficiently and effectively by simply following the above mentioned "Help Hierarchy"!

Finally "Help" that empowers, enriches and enables is the best form of help one can imagine because not only it brings semblance, restores equilibrium and reconnects you to your rhythm of life, in this process it transforms you from a seeker to a provider!

"Help" is always good when the beneficiary has a stake in its outcome and the source is closer home - and – of course - home always begins with "Self"!

"Help" is a dignified word, simply because we all are interdependent by nature, problem only arises when we only choose to be dependent!

"Help" someone, including yourself - like a "Catalyst" - play your role and get out of the situation as if you were never in it!

And lastly - always remember God helps those who help themselves!

*****

# पुण्याकडे जरा मिश्कीलपणे पाहू...!

१) एक बाग आहे पण फुले नाहीत - तुळशीबाग
२) न वाहात्या पाण्याचा थांबा. - नळस्टॉप
३) सांगायला दगड पण आहे गाव. - पाषाण
४) थकल्या भागल्यांची वाडी.- विश्रांतवाडी
५) मदतीचा हात पुढे करणारे - सहकारनगर
६) ह्या वड्याच्या वाटेला जाणे नको - येरवडा
७) आडवी तिडवी वस्ती - वाकडेवाडी
८) लहान पाखरू अन ढेरी मोठी - चिमण्या गणपती
९) फॉरेनची गल्ली - हॉंगकॉंग लेन
१०) थोर नेत्याच्या पदवीची वसाहत - लोकमान्य नगर
११) कवडी कवडीने संपत्ती मिळवली ती,- धनकवडी
१२) मिठाई वाला हनुमान - जिलब्या मारुती
१३) बेवडा ब्रीज - दारुवाला पूल
१४) पिडाकारी दैवताचा ओटा - शनी पार
१५) हार आहे तोही दगडाचा - खडकमाळ
१६) याचे थालीपीठ होत नाही - विद्यापीठ
१७) नकार देणारी पेठ - नाना पेठ
१८) नमुनेदार वसाहत - मॉडेल कॉलनी
१९) या बागेत सुवर्ण अलंकार नाहीत - हिराबाग
२०) इथे बांगडीवाले आहेत का हो ? - कासारवाडी
२१) कोंढाणा जिंकायला मदत केली - घोरपडी पेठ
२२) गिळंकृत करणारे मास्तर! - हडपसर
२३) सगळे इथे ऐटीत वावरतात.- हिंजवडी
२४) सुगंधित नगर - चंदन नगर
२५) सुधारलेला भितीदायक पट्टा - मगरपट्टा.

अस हाय पुणे.

# Oyster of memories



Dr. A. M. Joshi
aemjoshi@yahoo.co.in
+91 94230 01601

" Two hunters are out in the woods when one of them collapses. He does not seem to be breathing and his eyes are glazed. The other guy whips out his cellphone and calls the emergency services. He gasps:" My friend is dead! What can I do?" The operator says," calm down, I can help. First, let's make sure he is dead". There is a silence, then a shot is heard. Back on the phone, the guy says," ok, now what?"

The above joke was adjudged as the world's funniest jokes in the year 2002. It was told by a Sikh settled in Manchester, England. It was selected out of 40000 entries received from 70 countries. The result concluded a 13 month long experiment, launched in Britain by a psychologist Richard Wiseman to "delve into the psychology of humour".

The winner, Shri Gurupal Gossal, then 31, is a psychiatrist. He is a second generation Indian

immigrant from Punjab. He says," the joke makes people feel better because it reminds them that there is always someone out there who is doing something more stupid than themselves."

[Ref:Times of India 4-10-2002.]

*****

Jack_Welch [ Straight from the gut]

There is probably nothing worse in business than to work for a boss who doesn't want you to win. This can happen anywhere, at any level and probably occurs more often than we think.

Business is like a world class restaurant. When you peek behind the kitchen doors, the food never looks as good as when it comes to your table on fine china ,perfectly garnished . Business is messy and chaotic.

Compiled by - Prashant Ratnaparakhi

## Point to ponder [अवश्य वाचा]

### Living will [वैद्यकीय इच्छापत्र]

मृत्युपत्र हे संपत्तीची वाटणी करणारं असतं, मात्र वैद्यकीय इच्छापत्राद्वारा माझ्या शरीराचं काय करायचं, मला व्हेन्टिलेटरवर ठेवावं का? किती दिवस ठेवायचं? माझ्या आजारपणावर किती खर्च करायचा, शरीर वा अवयव दान करायचे का यांसारख्या इच्छा लिहून ठेवता येतात.

'वैद्यकीय इच्छापत्रा'च्या संकल्पनेची मुळं वृद्ध कल्याण शास्त्रज्ञ डॉ. रोहिणी पटवर्धन यांच्या मनांत रुजली आणि पुढे त्यांनी त्यांच्या प्रसाराचं कार्य सुरू केलं. 'लिव्हिंग विल' वा 'वैद्यकीय इच्छापत्र' ही संकल्पना पाश्चात्त्य देशांत प्रचलित असली तरी भारतात मात्र अजून म्हणावा तेवढा प्रचार व प्रसार झालेला नाही. पण बदलत्या काळानुसार आज 'वैद्यकीय इच्छापत्रा'ची निकड भासू लागली आहे हे निश्चित! वस्तुत: ही संकल्पना अद्याप कायद्याच्या चौकटीत नसली तरी ती एक विचारांची दिशा आहे. 'माझे वा माझ्या शरीराचे हाल होऊ नयेत, माझ्या कुटुंबियांना निर्णय घेण्यासाठी मानसिक त्रास होऊ नये. त्यांच्यावर महागड्या उपचारांचा ताण पडू

नये,' या भूमिकेतून वृद्ध आपली इच्छा या 'लिव्हिंग विल' द्वारे व्यक्त करू शकतात.

आपलं शरीर व तब्येत हीसुद्धा एक प्रकारे आपली मालमत्ताच नसते का? मग त्यासंबंधी निर्णय निदान भविष्यकाळातील वैद्यकीय उपचारांबाबतचे आपले आपणच घ्यायला नको का? एखाद्याला बिछान्याला खिळून जगायचं नसेल किंवा कृत्रिम वैद्यकीय उपचार करून घेऊन जिवंत राहायचं नसेल, पण असे निर्णय घेण्यास तो समर्थ नसेल तर आपल्या प्रकृतीसंदर्भात कोणते उपचार केले जावेत वा जाऊ नयेत याचे स्पष्ट निर्देश करणारा दस्तऐवज म्हणजे 'लिव्हिंग विल' अर्थात 'वैद्यकीय इच्छापत्र'! या 'लिव्हिंग विल'मध्ये आयुर्मर्यादा वाढवणारे कोणतेही उपचार उदा. नळीने अन्न देणं, व्हेन्टिलेटरवर ठेवणं वगैरे करू नयेत असे स्पष्ट निर्देश करता येतात. तसेच देहदान, नेत्रदान, त्वचादान, अवयवदान यांसारख्या इच्छांचाही उल्लेख करता येतो. मात्र आपले फॅमेली डॉक्टर आणि कुटुंबियांशी नीट चर्चा करूनच हे इच्छापत्र बनवायला हवे. इतकं सगळं करूनही रुग्णालयातील आपल्या आई वडिलांच्या बाबतीत काय करायचं, हा निर्णय शेवटी मुलांकडे रहातोच. वृद्धांसाठी आपली इच्छा व्यक्त करण्याचा फक्त हा एक मार्ग आहे.

आपल्या शरीरावरील उपचारांविषयीच्या सर्व इच्छा शंभर रुपयांच्या स्टॅम्पपेपरवर लिहून त्यावर ज्या व्यक्तीचं ते 'लिव्हिंग विल' आहे त्या व्यक्तीने सही करावयाची असते. त्यानंतर ही व्यक्ती सही करण्यास मानसिक व वैद्यकीयदृष्टया सक्षम आहे असं लिहून त्यावर डॉक्टर सही करतात. त्याचबरोबर पती अथवा पत्नी तसंच मुलं व जवळच्या दोन विश्वासू व्यक्तींच्या सहय़ा घेऊन हे इच्छापत्र नोटराइज्ड करावं लागतं. हे नोटराईज केल्यामुळे ज्येष्ठांची तशी इच्छा होती हे स्पष्ट होण्यास मदत होते. त्यानंतर या इच्छापत्राच्या सत्यप्रती काढून त्या फॅमिली डॉक्टर, कुटुंबीय व शक्य झाल्यास हॉस्पिटलला द्याव्या लागतात. फक्त हे इच्छापत्र करण्यापूर्वी प्राथमिक स्वरूपाची चर्चा पती-पत्नी, मुलं, डॉक्टर व सुहृद यांच्याबरोबर अवश्य करावी. तरच या इच्छापत्रातील इच्छांची पूर्तता होण्याची खूप शक्यता असते.

"अर्थात तरीसुद्धा अनेक वेळा समोर मृत्यू दिसू लागताच तोंडाने कितीही निरवानिरवीची भाषा केली तरी रुग्ण उपचार सुरू ठेवायला सांगतात. व जोपर्यंत रुग्ण आपली इच्छा व्यक्त करण्याच्या परिस्थितीत असतो तोपर्यंत त्याच्या इच्छेनुसारच उपचार केले जातात. अनेक वेळा रुग्ण बेशुद्धावस्थेत असेल तरी भावनेच्या भरात

नातलगच रुग्णास उपचार सुरू ठेवण्याचा आग्रह धरतात व 'लिव्हिंग विल'ला विरोध करतात. एक डॉक्टर म्हणून नातलगांच्या मताचा आदर केला जातो त्यामुळे कुणाच्याही भावना दुखावल्या जाण्याची शक्यता नाही.'

अनेक रुग्णांचे फॅमिली डॉक्टर असणारे व ज्येष्ठ नागरिकांसाठी भरीव कार्य करणारे डॉ. दिलीप देवधर 'वैद्यकीय इच्छापत्रा'च्या अंमलबजावणीतील वस्तुस्थिती सांगतात. 'लिव्हिंग विल' अमलात आणताना एक डॉक्टर म्हणून आमचे काही निकष असतात. सर्वसाधारणपणे रुग्णाचं वय ७५ च्या वर असेल तरच हा निर्णय घेतला जातो. त्यातही आम्ही डॉक्टर रुग्णावरील उपचार एकदम बंद करत नाही. मल्टिपल ऑर्गन फेल्युअर असेल तर साधारणपणे ७२ तासांत व जास्तीत जास्त ४ ते ५ दिवसांत शरीर उपचारांना प्रतिसाद देऊ लागतं. जर तसं झालं नाही तर रुग्णाचे जवळचे नातलग, फॅमिली डॉक्टर, त्याच्यावर उपचार करणारे डॉक्टर असे सर्व जण एकत्र बसून चर्चा करतात व त्यानंतरच रुग्णाने शांतपणे मृत्यूला सामोरं जावं, असा निर्णय घेतला जातो. अर्थात अशा वेळी रुग्णाने स्वत: जर असं वैद्यकीय इच्छापत्र केलं असेल तर सर्वांनाच हा कठीण निर्णय घेणं सोपं जातं व जवळच्या नातलगांना अपराधीभाव येत नाहीत.

सर्वसाधारणपणे डॉक्टरांचा अनुभव असा आहे की मध्यमवर्गीय माणसं भावनेच्या आहारी जाऊन रुग्णाच्या उपचारांसाठी भरमसाट खर्च करतात. वेळेला जमीनजुमला, दागदागिनेसुद्धा विकतात. भारी व्याजाने कर्ज उचलतात. त्यांची पुढची दहा-पंधरा वर्ष कर्जफेडीतच जातात व ज्या रुग्णासाठी ते आपल्या मुलांच्या तोंडचा घास काढतात तो रुग्णही हाताला लागत नाही व निराशा पदरी पडते. अशा वेळी 'लिव्हिंग विल' असेल तर ते कुटुंब मोठय़ा संकटातून वाचू शकतं.

आज माणसाची आयुर्मर्यादा वाढल्यामुळे आर्थिक गणितं साफ बदलली आहेत. वैद्यकीय खर्च सामान्य माणसाच्या आवाक्याबाहेर जात आहे. फॅमिली डॉक्टर ही संकल्पना मोडीत निघाल्याने जबाबदारी घेऊन रुग्णाला त्याच्या परिस्थितीनुसार सल्ला देणारे डॉक्टर आता राहिले नाहीत. हल्लीची तरुण पिढी व्यवसायानिमित्त परगावी किंवा परदेशी असते. त्यामुळे परावलंबी रुग्णाला सांभाळणं खूप कठीण होत चाललं आहे. बरेच वेळा अशा मृत्युशय्येवरील रुग्णाला ठरावीक मुदतीपुढे हॉस्पिटलही ठेवून घेत नाहीत. अशा वेळी 'लिव्हिंग विल' असेल तर केवळ कृत्रिम यंत्रणांवर जिवंत असणाऱ्या रुग्णाच्या नातलगांना कटू निर्णय घेण्यासाठी 'लिव्हिंग विल' हा फार मोठा दिलासा ठरू शकतो.

परदेशस्थ मुलं तिथल्या नियमांप्रमाणे इथेही उपचारांची दिशा ठरवण्याचा आग्रह धरतात. त्यांना इथल्या अडचणी व मर्यादा लक्षात येत नाहीत व त्याचा इथे त्यांच्यावर उपचार करणारे डॉक्टर्स व जवळचे नातलग यांना खूप त्रास होतो. आई-वडील तब्येतीने धडधाकट असतानाच परदेशस्थ मुलं, इथे ज्येष्ठांची काळजी घेणारे दोन नातलग आणि डॉक्टर यांनी एकत्र बैठक घेऊन पुढील काळात ज्येष्ठ आजारी पडल्यास त्यांच्या उपचारांची दिशा, व्याप्ती व मर्यादा यांचा साकल्याने विचार करून असं 'वैद्यकीय इच्छापत्र' केलं तर ते सर्वांनाच खूप सोयीचं होईल. अर्थात त्यासाठी निरोगी वृद्धांनी एखाद्या तरी डॉक्टरशी सतत संपर्कात राहून नियमित वैद्यकीय चाचण्या कराव्यात.

'वैद्यकीय इच्छापत्र' अशा एकटय़ा अविवाहित, विनापत्य, मुलं असूनही जवळ नाहीत वा ज्यांना सांभाळणारं कोणीही नाही त्यांच्यासाठी वरदान आहे. तसंच असाध्य व्याधींनी पीडित ज्यावर औषध व उपचार उपलब्ध नाहीत अशांसाठीही ते उपयुक्त आहे.

आयुष्यभर ज्या मुलांवर आपण जिवापाड प्रेम करतो, त्यांच्यासाठी कष्ट उपसतो, त्यांच्यावर अनावश्यक उपचाराचं ओझं लादणं वा त्यांना अप्रिय निर्णय घ्यायला लावणं यापेक्षा व्यावहारिक विचार करून 'लिव्हिंग विल'

चा पर्याय स्वीकारणं अधिक योग्य आहे नाही का?

वैद्यकीय इच्छापत्रासंदर्भात अधिक माहितीसाठी संपर्क साधा - डॉ. रोहिणी पटवर्धन - ९०२८६६४३३३

**लिव्हिंग विल वा वैद्यकीय इच्छापत्र नमुना**

मी, …… जर कोणत्याही आजारामुळे अथवा अपघातामुळे माझ्या उपचारासंबंधी निर्णय घेण्यास असमर्थ झालो, तर निम्निलिखित सूचनांचे काटेकोरपणे पालन व्हावे, अशी माझी इच्छा आहे.

सूचना -

ज्यामुळे पुन्हा अर्थपूर्ण वा सर्वसामान्य ((Normal) जीवन अशक्य होईल, किंवा उपचार करूनही सहा महिन्यांच्या आत मृत्यू संभवेल, अथवा कायमची बेशुद्धावस्था (unconsciousness and/or brain death) अशी माझी स्थिती झाल्यास.

'मला रुग्णालयात ठेवू नये, तसेच भरपाई होऊ शकणाऱ्या आरोग्यविमा रकमेपेक्षा जास्त खर्च करू नये.

'मेंदू मृत म्हणून डॉक्टरांनी घोषित केल्यास माझे जीवन लांबविणारा कोणताही उपचार करू नये. उदा. शस्त्रक्रिया, कृत्रिम श्वसन (ventilator , life support), तसेच

डायलिसिस, औषधे, रक्त/रक्तजन्य पदार्थ तसेच कृत्रिमरित्या अन्नपाणी देऊ नये.

'मला वेदना होत असल्यास वेदनाशामके द्यावीत. तसेच मी आक्रमक/हिंसक झाल्यास शांत करण्यासाठी आवश्यक ते उपचार जरूर करावेत.

माझी काळजी घेणारी कोणतीही व्यक्ती तसेच संबंधित डॉक्टर यांच्यावर अवघड निर्णय घेण्यासाठी जबाबदारी देऊ नये व त्यांची अप्रतिष्ठा होऊ नये या हेतूने हे इच्छापत्र मी उत्तम मानसिक स्थिती असताना व परिणामांचा काळजीपूर्वक विचार करून लिहीत आहे.

या इच्छापत्रासंबंधी निर्णय घेण्याचे व त्याची अंमलबजावणी करण्याचे अधिकार मी खालील व्यक्तींना देत आहे.

१).....................

२)................

स्वाक्षरी

................

हा वैद्यकीय इच्छापत्राचा फक्त नमुना आहे. त्यातील कोणतेही मुद्दे तुम्ही कमी जास्त करू शकता.

मृत्युपश्चात अवयवदानापासून ते अंत्यविधीसाठीच्या खर्चापर्यंत अनेक मुद्दयांचा यात समावेश करता येतो.

इच्छापत्र करताना

* आपल्या शरीरावरील उपचारांविषयीच्या सर्व इच्छा शंभर रुपयांच्या स्टँपपेपरवर लिहून त्यावर ज्या व्यक्तीचे हे इच्छापत्र आहे त्या व्यक्तीने सही करावयाची असते.
* त्यानंतर ही व्यक्ती सही करण्यास मानसिक व वैद्यकीयदृष्टया सक्षम आहे, असे लिहून त्यावर डॉक्टर सही करतात.
* या वेळी पती अथवा पत्नी तसेच मुले व जवळच्या दोन विश्वासू व्यक्तींच्या सहृया घेऊन हे इच्छापत्र नोटराइज्ड करावे लागते.
* त्यानंतर त्याच्या सत्यप्रती काढून त्या फॅमिली डॉक्टर, कुटुंबीय व शक्य झाल्यास हॉस्पिटलला द्याव्या.

**हा लेखी दस्तऐवज असल्याने कायद्याच्या दृष्टिकोनातूनही तो ग्राह्य धरला जातो.**

मूळ लेख- लोकसत्ता, चतुरंग, प्लॉट नं. ई.एल १३८, टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, महापे, नवी मुंबई ४०० ७१०.

# Ethical experiences of members



**Avinash bhide**
**avinashbhide@yahoo.com**
**+919823051981**

## In Soup' While Having Soup

I never imagined that I would be 'in soup' while having soup at one of the fine restaurants in Tokyo.

I remember it was a beautiful evening, when I was invited to dinner by my friend Kawasaki and his wife Yashika, during the last 3 days of my stay in Tokyo.

We had gone to the restaurant of a five star hotel for my treat. Before dinner, they had ordered a special soup, which was served in a bowl with a different shape along with the soup spoon.

While chatting about my stay in Japan and my experiences at Kyoto, we all started with our soup. As per the standard practice, I had my soup with the help of the soup spoon without making any drinking noise as per our Indian customs.

But Yashika and Kawasaki lifted their bowls and the spoons in their hands and began to make noises while having their soup. This surprised me

since it was so different from the table manners followed in India.
Although I tried to mask my surprise, both of them did notice it. They looked at me silently while I quietly finished my soup.
I was a little upset that Kawasaki and Yashika were probably not aware of the table manners to be followed in five star restaurants. We then had dinner, which was delicious.
Before leaving the dinner table, Yashika said, "Bhidesan, I could see that you were surprised while we were enjoying our soup. At the same time, we were a little surprised to know your ignorance about table manners in Japan although you have stayed here for nearly 5 to 6 months and enjoyed all the special varieties of food available in Japan. Although it is quite likely that you may not have had an opportunity to taste this soup during your stay at Kyoto, you would be pleased to know that this is the only soup in Japan which you can have while making drinking noises. Doing so is considered proper table manners."
It was a wonderful addition to my knowledge and I really felt that while having Japanese soup, 'I was in soup'.

*****

# Paintings



Naresh Sareen
nareshsareen@gmail.com
+91 98508 24851





Shrirang Gokhale
Skg2743@gmail.com
+91 98605 65564

Shrirang Gokhale



# Poem

## घरीं एकच पणती- वि. स. खांडेकर

घरीं एकच पणती मिणमिणती ।
म्हणुं नको उचल चल लगबग ती ।ध्रु०।।

अगणित बांधव तव अंधारीं ।
किर्र रान ! भय भंवतीं भारी ।
चरणीं जिवाणू भरे शिरशिरी ।
यमदूत न कीटक किरकिरती ।।१।।

काळोखाच्या भयाण लाटा ।
उठती फुटती बारा वाटा ।
फेंस पसरला सारा कांठा ।
कुणि म्हणती तारका लुकलुकती ।।२।।

दिवे विजेचे धनिक मंदिरीं।
प्रकाश पाडिती परोपरि जरी ।
स्नेहशून्य ते सदा अंतरीं।
कां करिसी तयांची शिरगणती ? ।।३।।

अखंड नंदादीपज्योती ।
दगडी देवा सोबत करिती।
नच बाहेरी क्षणभरि येती ।

अप्सरा विलासी नसति सती ॥४॥

धांव म्हणुनि तव घेऊनि पणती ।
हृदय नाचुं दे तिजसांगातीं।
सोन्याचे घर - दिसते माती।
रे पाहसि मागें वळूनि किती ? ॥५॥

पहा पुढें या दीन लोचनीं।
रविकिरणांचे स्मरण होऊनी ।
आशा नाचे ज्योत दुज्या क्षणि ।
जरि विझे तरि करी कोण क्षिती ? ॥६॥



# Creativity



Pranav Patil
pensafe@gmail.com
+91 98223 22184

What happens if bees study us like we study them, and publish papers in their own world?
- Bee katta, Pune

Glorias - a mysterious, rare, but growing Ape species with several evolving traits. (Jai bee, Nam bee, 2021)
Humans (Gloria-Apes) appear growing in their occurence over the last century. At estimated 7-8 bn they are 0.2% the number of potential tree homes available globally. However, they are by themselves not directly habitable opportunities outside their building structures. Gloria apes colonize inside a mix of concretized metal structures, known as buildings. ( Col bee, Ven bee et. al 1867, 1989 ). They also produce their own illuminating cadence often isolating themselves from sunlight ( Char bee, Bar bee et. al, 1925 basis observational studies inside several building structures ). Buildings also block outside air, and instead have their own tubular structures or revolving plates with circular or square discharge outlets. ( Mai bee et. al 1962. #1 Details below )

Few Glorias that are occasionally spotted in dense tree zones are the rare diminishing sub-species among the Glorias. Heavy Gloria aka human settlements are found in rare to extremely dense packets with very less to minimal tree covers. These colonies carry variety of metal and concrete structures even outside the buildings. Moving metal cubicles are used by Glorias to transfer themselves from building to building. These cubicles can be easily spotted via CO2 emission trails left behind ( Har bee, Vas bee et. al, 1952, 1990 ). The exact reason for changing buildings is not known till date, but there is increasing evidence that this is primarily to advance mating opportunities.
Building structures are cultivable areas for temporary breeding party camps. However, Gloria apes can get extremely aggressive on occasions often with toxic gaseous discharge. The cause of aggression is not traceable, and hence hypothesized to be random though several attempts have been made to discover clues in this direction. Certain non-agresssive type Glorias predominantly occur in rare density zones - however by all known external features they are indistinguishable from aggresive Glorias. A study on tree cover in Gloria habitats vis-a-vis the level of aggression is underway by Mys bee et. al.

The Gloria are bisexual with evidences of a sophisticated male-female dynamic. Bonded partnerships are common occurrence. Though male-female both seem to share food gathering responsibility, baby feeding primarily belongs to female. Food gathering involves use of several attached pouches and packets that move long distances before finding their way to hand and stomach. Some Glorias are seen making use of metal rods in feeding themselves. The direct evolutionary advantage for this act remains unknown, hence it's attributed as a signalling strategy to express superior mating skills.

Males have several affection traits displayed in early mating periods that are used to trap the female - often for entire life span. ( Lag bee, Jev bee et. al, 1896). Post mating male and female pairs spend sufficient day time in different building structures even though are seen sharing common building structures in the night time ( Vas bee et. al, 1975 ). Offsprings share same building structure as female until they seem to show adult-like building changing tendencies post 3-5 years of life. Few exceptions occur. In a recent study, the acts of changing building structures have severally seen to be reduced in the course of last one year.

*****

# Humour – funny laws

01. *BELL'S THEOREM*
When the body is immersed in water, the telephone rings.

02. *RUBY'S PRINCIPLE OF CLOSE ENCOUNTERS*
The probability of meeting someone u know increases when u are with someone u don't want to be seen with.

03. *WILLOUGHBY'S LAW*
When u try to prove to someone that a machine won't work, it will.

04. *ZADRA'S LAW OF BIOMECHANICS*
The severity of the itch is inversely proportional to the reach.

05. *BREDA'S RULE*
At any event, the people whose seats are farthest from the aisle arrive last.

06. *OWEN'S LAW*
As soon as u sit down to a cup of hot coffee, your boss will ask u to do something which will last until the coffee is cold.

## Positive thinking

# *पॉवर ऑफ चॉइस*

*सुप्रसिद्ध साहित्यिक चेतन भगत याने सांगितलेला हा किस्सा आहे.*

मी एअरपोर्टच्या बाहेर टॅक्सीसाठी रांगेत उभा होतो. तेवढ्यात माझ्यासमोर एक टॅक्सी येऊन उभी राहीली. पहिली गोष्ट माझ्या लक्षात आली की ती टॅक्सी बाहेरून नुसतीच स्वच्छ नव्हती तर चकचकीत पॉलीश केलेली होती. टॅक्सीचा ड्रायव्हर खाली उतरून व टॅक्सीला वळसा घालुन माझ्याकडे येत होता. त्यावेळी माझ्या लक्षात आले की त्याचा ड्रेस एकदम स्मार्ट आहे. त्याने स्वच्छ धुतलेला व इस्री केलेला पांढरा शर्ट घातला होता. तशीच इस्त्री केलेली काळी पॅंट होती. टाय लावलेला होता व पायात चकचकीत पॉलीश केलेले बुट होते. त्याने आदराने माझ्यासाठी टॅक्सीचे मागील दार उघडले व माझ्या हातात एक लॅमीनेट केलेले कार्ड देत म्हणाला, ‘ सर! माझे नाव वासु! मी तुमचा टॅक्सी ड्रायव्हर. मी तुमचे सामान मागे डिकीमध्ये ठेवेपर्यंत आपण हे माझे मिशन स्टेटमेन्ट कृपया वाचावे.’

‘मिशन स्टेटमेन्ट?’ मला गंमत वाटली व मी त्या कार्डावर नजर टाकली. त्यावर सुरेख व ठळक अक्षरात छापले होते. ‘ वासुचे मिशन स्टेटमेन्ट! माझ्या टॅक्सीमधील प्रवाशांना कमीत कमी खर्चात, कमीत कमी वेळात, सुरक्षितपणे त्यांच्या इच्छीत स्थळी पोचवणे व ते सुद्धा मैत्रीपूर्ण वातावरणात!’

मला गंमत वाटली. मी टॅक्सीत बसलो व मला आश्चर्याचा धक्काच बसला. कारण टॅक्सी आतुनसुद्धा बाहेरच्यासारखी चकचकीत स्वच्छ होती.

वासुने त्याच्या ड्रायव्हरच्या सिटवर बसता बसता विचारले, 'सर! आपण कॉफी घेणार? माझ्याकडे थर्मासमध्ये रेग्युलर तसेच 'डिकॅफ' कॉफी आहे!'

मी सहज गंमत करावी म्हणून म्हणालो, 'नको! मला कॉफी नको! काहीतरी थंड पेय हवे आहे!'

'काही हरकत नाही!' वासु म्हणाला, 'माझ्याकडे पुढे कुलर आहे. त्यामध्ये रेग्युलर व डायट कोक, लस्सी, पाणी व ऑरेंज ज्युस आहे.'

'मला लस्सी चालेल!' मी म्हणालो पण माझ्या चेहेऱ्यावरचे आश्चर्य काही लपत नव्हते.

माझ्या हातात लस्सी देताना वासु म्हणाला, 'आपल्याला जर वाचायला काही हवे असेल तर टॅक्सीमध्ये द हिन्दु, टाईम्स ऑफ इंडिया, इकॉनॉमिक टाईम्स व इंडिया टुडे आहे.'

माझ्या हातात अजुन एक लॅमिनेटेड कार्ड देत वासु म्हणाला, 'ही रेडियो स्टेशन्स व त्यावर असलेल्या कार्यक्रमांची यादी, जर आपल्याला रेडीयो ऐकायचा असेल तर!'

मला वासुचे कौतुक वाटु लागले होते. टॅक्सी सुरु करताना वासु म्हणाला, 'मी एअर कंडीशनींग चालु केले आहे. टेम्परेचर योग्य आहे ना व आपल्याला कंफर्टेबल वाटते ना? का यात ॲजेस्ट करू?'

वासुने मला त्यावेळी माझ्या इच्छीत स्थळी जाण्याचा सर्वात चांगला मार्ग कोणता हे सांगीतले. तसेच वाटेत कोणकोणती प्रेक्षणीय स्थळे लागतात याची पण माहिती दिली.

'आपणास हरकत नसेल तर आपण माझ्याशी गप्पा मारू शकता. पण आपल्याला जर एकांत हवा असेल तर मी आपल्याला डिस्टर्ब करणार नाही' वासु म्हणाला.
'मला एक सांग वासु!' मला माझे आश्चर्य अजुनही लपवता येत नव्हते, 'तु तुझ्या ग्राहकांना नेहमी अशीच सेवा देत असतोस?'
वासुच्या चेहेऱ्यावर हास्य पसरले. 'नाही सर! गेल्या दोन वर्षांपासुनच मी हे सुरु केले. या आधीची पाच वर्षे मी इतर सर्वसामान्य टॅक्सी ड्रायव्हरसारखाच होतो. गबाळा, अनुत्साही, सतत कसल्या ना कसल्या तरी तक्रारी करत बसणारा!
पण एक दिवशी मला 'पॉवर ऑफ चॉइस' बद्दल कळले!'
'पॉवर ऑफ चॉइस म्हणजे?' मी उत्सुकतेने विचारले,
'पॉवर ऑफ चॉइस म्हणजे तुम्ही बगळा व्हायचे का गरुड व्हायचे याचा चॉइस!' वासु म्हणाला, 'तुम्ही सकाळी उठलात व म्हणालात की आजचा दिवस चांगला जाणार तर तुमची कधीच निराशा होणार नाही. तक्रारी करण्याचे थांबवा! गरूड व्हा, बगळा होऊ नका! कारण बगळा सतत 'क्वॅक क्वॅक' करत असतो म्हणजे तक्रारी करत बसतो. तर गरुड येणाऱ्या सर्व अडचणी, अडथळे, संकटे यावर मात करत आकाशात उंच भरारी घेत असतो, ढगांच्या वर जात असतो. माझ्या डोक्यात हे वाक्य पक्के बसले' वासु म्हणाला-
'आता मी माझीच गोष्ट सांगतो. मी आधी बगळा होतो. सतत तक्रारी करत बसायचो. पण मग मी माझ्या मनोवृत्तीत बदल करायचे ठरवले. बगळा न होता गरुड व्हायचे ठरवले. मी आजुबाजुला निरिक्षण करायला सुरवात केली. बहुतेक टॅक्सी ड्रायव्हर गबाळे व गलीच्छ असतात, ग्राहकांची काळजी न

घेणारे असतात. ग्राहक नेहमी त्यांच्याबद्दल तक्रारी करत असतात. त्यांच्या गाड्या पण खराब व अस्वच्छ असतात. मी माझ्या बाबतीत काही बदल करायचे ठरवले. थोडे थोडे बदल करत गेलो!' वासु सांगत होता.

'मग याचा तुला चांगला फायदा झाला असेल नाही का?' मी वासुला विचारले.

'झाला तर!' वासु उत्साहाने सांगू लागला. 'मी गरुड व्हायचे ठरवल्यावर पहिल्या वर्षीच माझे उत्पन्न आधीच्या वर्षापेक्षा दुपटीने वाढले. या वर्षी कदाचित माझे उत्पन्न चौपट वाढेल. माझ्या अनेक ग्राहकांनी माझा सेल फोन नंबर घेतला आहे. ते माझीच टॅक्सी हवी म्हणून फोन करत असतात. बहुतेक वेळा माझी टॅक्सी ॲडव्हान्समध्ये बुक होते.'

*गरुड व्हा, बगळा होऊ नका!*

वासुने वेगळा चॉइस केला. त्याने किरकिर करणारा बगळा न होता आकाशात उंच भरारी घेणारा गरूड व्हायचे ठरवले. त्याचे फळ त्याला मिळाले.

बगळा व्हायचे का गरुड व्हायचे हा चॉइस देवाने प्रत्येकालाच दिलेला आहे, अगदी जन्मापासून ते मरेपर्यंत!

आता आपण बगळा व्हायचे का गरुड व्हायचे हे ज्याचे त्याने ठरवायचे नाही का ?

Source- social media

# Laughter Corner

Source – social media







***For more information about Business Ethics Foundation, please visit***

**[www.punebef.com](http://www.punebef.com)**

***** *****  ***** *****